# शिवाजी महाराजांचे सिद्दीविषयक धोरण

**प्रविण लक्ष्मण चिंतोरे** संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर.

Email: pravinchintore@gmail.Com / Mobile No.9284476613

---

**सारांश :** छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्याची स्थापना करताना सुरुवातीला दक्षिणेतील आदिलशाही, तसेच पश्चिम किनाऱ्यावरील सिद्दी, पोर्तुगीज व इंग्रज यांच्याशीही संघर्ष करावा लागला. इंग्रज, पोर्तुगीज व सिद्दी भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील या सागरी सत्तांचा मराठयांच्या राज्याशी संबंध येत होता. शिवाजी महाराजांनी जावळीच्या मोयांचा पराभव केल्यानंतर त्यांच्या राज्याच्या सीमा वाढून त्या समुद्रापर्यंत पोहचल्या होत्या. त्यामुळे मराठयांचा सागरी सत्तांशी संबंध आला. शिवाजी महाराजांनी आरमाराची स्थापना करुन त्याची वाढ केल्यामुळे समुद्री किनारा असणाया सिद्दी, पोर्तुगीज व इंग्रज या सत्तांशी शिवाजी राजांचा संबंध आला. यापैकी पोर्तुगीज, इंग्रज या परकीय सत्ता होत्या तर राजापूर व जंजिऱ्यावर सत्ता गाजविणारा सिद्दी हा कधी निजामाच्या, कधी आदिलशहाच्या तर कधी मुगलांच्या अधिपत्याखाली होता. प्रदेश या देशी सत्तांचा असला तरी वर वर्चस्व मात्र हबशांचे म्हणजेच दक्षिण आफ्रिकेतून आलेल्या हबशांचे होते. या सागरी सत्ता मराठयांच्या वर्चस्वाला शह देत होत्या. तसेच मराठयांच्या प्रदेशातील प्रजेचा निरनिराळया कारणांसाठी छळ करीत होत्या. त्यामुळे छत्रपती शिवाजी राजे यांचे या सत्तांशी संबंध येणे अपरिहार्यच होते. प्रस्तुत संशोधन पेपर मध्ये शिवाजी महाराज व सिद्दी यांच्या संबंधावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**उद्दिष्टे**

१) छत्रपती शिवाजी महाराज व सिद्दी संबंध अभ्यासणे.

२) शिवाजी महाराजांच्या आरमार नीतीचा अभ्यास करणे.

**छत्रपती शिवाजी महाराज व सिद्दी संबंध** सिद्दी हे मूळचे अबसिनियातील रहिवासी होते. इ.स. १६४८ मध्ये जेव्हा शिवाजीने कल्याण प्रांत हस्तगत केला, तेव्हा तळे, घोसाळ व रायरी हे किल्लेही त्याने काबीज केले. तेव्हापासून मराठे व सिद्दी यांच्यात जो संघर्ष उत्पन्न झाला तो जवळजवळ पेशवाईचा शेवट होईपर्यंत तसाच चालू राहिला. बहामनी राजांच्या दरबारात या सिद्दी सरदारांना महत्वाचे स्थान होते. सिद्दी सिरुलखान या ॲबिसिनीयन सरदाराची सन १६१८ मध्ये जंजियाचा किल्लेदार म्हणून नेमणूक झाली, १६२० ला सिद्दी याकूब व मागोमाग सिद्दी अंबर (सानक) हे जंजियाचे किल्लेदार झाले.[१] मोगलांनी अहमदनगर राज्य इ.स. १६३६ मध्ये बुडविले व अहमदनगरच्या ताब्यातील उत्तर कोकणचा मुलूख विजापूरकरांकडे दिला. या काळातच जंजियाचे महत्व वाढले. विजापूरच्या आदिलशाही राज्यकर्त्यांनी आपल्या व्यापाराचची व मक्केला जाणाया यात्रेकरुंची संरक्षण करण्याची जबाबदारी ॲबिसिनीयन आरमारी प्रमुखावर सोपवली व त्यास वजीर असा किताब दिला. इ.स.१६३६ ते १६६७ या काळात सिद्दी अंबर, सिद्दी युसूफखान व फत्तेखान हे वजीर होऊन गेले. फत्तेखान याच्या हाताखालील सिद्दी संबूळ, कासम व खैरियत हे तीन अधिकारी मराठयांचे कट्टर वैरी बनले. फत्तेखान इ.स.१६६७ मध्ये मरण पावला.[२] सरहद्दीचा बंदोबस्त करणे हे राज्य संरक्षणाचे मुख्य कार्य असल्यामुळे कारवारपासून सुरतपर्यंत पश्चिम किनायावर आपल्याला कोणी शत्रू नसावा अशी व्यवस्था शिवाजी राजेंना करावयाची होती. हा हेतू सिद्दीस नेण्यासाठी सिद्दीची अडचण त्यांना होती. म्हणून सिद्दीचा पाडाव करण्याचे काम त्यांनी हाती घेतले. यातूनच मराठयांच्या आरमाराची उत्पत्ती झाली.

जंजियाचा सुभेदार युसूफखान इ.स. १६६५ मध्ये मेला. त्यानंतर त्याचा मुलगा फत्तेखान दंडराजपुरीचा हवालदार झाला. एप्रिल १६५६ मध्ये रायगडावरील मोहीम संपल्यानंतर इ.स.१६५७ च्या जुलैत शिवाजीराजे यांनी जंजिरा काबीज करण्यासाठी निळोपंत रघुनाथ याबरोबर आरमार व फौज देऊन पाठविले. रघुनाथपंतांनी दंडराजपुरी येथील हबशांवर हल्ला केला व त्यास जेरीस आणले तेव्हा त्याने वकील पाठवून रघुनाथपंतांशी सल्ला केला. सख्य होऊन रघुनाथपंतांस हबशी याने वस्त्रे व घोडा दिला. रघुनाथपंतास कोकणच्या सुभ्यावर नेमण्यात आले होते. त्यांच्या मदतीस शामराज निळकंठ व बाजी घोलप हे होते. परंतु इ.स. १६५९ च्या सुरुवातीस रघुनाथपंतांची पाठ फिरताच पुन्हा कोकणात उपद्रव देऊ लागला. म्हणून १६५९ च्या पावसाळयात शिवाजीराजे यांनी अण्णाजी दत्तोबाचा भाऊ व्यंकोजी दत्तो याच्याबरोबर दुसरी फौज जंजियावर पाठवली.[३] त्याच्याबरोबर पाच हजार स्वार व दोन हजार लोक मावळे दिले. मागून मोरोपंत पिंगळे यासही व्यंकोजीच्या मदतीस पाठवले. दर्यासारंग दौलतखान यांनी नवीन उत्कृष्ट आरमार वाढवून जंजियास वेढा घातला आणि लढाईचे काम निकराने चालविले. सिद्दी खैर्यतही मोठया शिकस्तीने लढला.[४] पण जेरीस आला. म्हणून नाइलाज झाला. तेव्हा खैरतने शिवाजी राजास दंडराजपुरी देऊन तह केला, फक्त जंजिरा किल्ला सिद्दीच्या ताब्यात राहिला. त्यास व्यंकोजीपंतांनी वेढा घातला. शिवाजी राजे यांनी लगेच जिंकलेल्या प्रदेशाची व्यवस्था ठरवून व्यंकोजीपंतास सुभेदार नेमले आणि त्याच्या मदतीस सिद्दीच्या बंदोबस्तासाठी ७ हजार फौज कायमची ठेवून दिली.[५] परंतू हा वेढा उठवून सर्वांना अफझलखानाच्या मसलतीस तोंड देण्यास घाटावर जावे लागले. त्यामुळे जंजिरा कोट घेणे बाकी राहिले. नंतर आदिलशहा व मोगल यांच्याशी लढण्यात वेळ गेल्याने शिवाजी राजे यांना कोकणाकडे लक्ष देणे शक्य झाले नाही.

सिद्दीने आठ वर्षे आरमाराच्या जोरावर शिवाजी राजांच्या मुलूखास उपद्रव दिला. ते पाहून आपल्याकडे सुसज्ज आरमार असल्याशिवाय आपला ताबा कोकण प्रदेशावर बसणार नाही अशी राजांची खात्री झाली म्हणून इ.स.१६५९ मध्ये त्यांनी आपले

स्वत: चे आरमार तयार केले.[६] तसेच इ.स. १६६३ मध्ये दोन अवजड व मोठी व्यापारी जहाजे बांधून ती जैतपुराहून मोचा येथे पाठवली. नंतर १६६५ पासून राजियांची गलबते दरवर्षी पर्शिया, बसरा, मोचा इ. ठिकाणी व्यापाराकरता रवाना होऊ लागली. अशा प्रकारे राजियांनी स्वत: ची व्यापारी जहाजे व आरमार तयार केली. लहान-मोठी ५०० जहाजे ठेवून दिली. आरमाराचे अधिपत्य दर्यासारंग, इब्राहीमखान व मायनाक भंडारी यांच्याकडे देऊन त्यांच्या हाताखाली भरपूर खलाशी दिले व आरमार सुभा निर्माण केला.[७] इ.स.१६६५ मध्ये जयसिंग महाराष्ट्रात आल्यावर त्यास सिद्दीच्या आरमाराचे महत्व पटले म्हणून त्याने त्यास बादशहाकडून हुकूम काढून मोगल सेवेत घेतले. तेव्हापासून सिद्दी मोगल बादशहाचा आरमारी सरदार बनला.[८] विजापूरकरांशी जो त्याचा संबंध होता तो त्यावेळी तुटला.

**कोकणावर मालकी** कोकणावर मालकी दाखवणाया प्रत्येक सत्ताधायाने एकतर सिद्दीचे सामर्थ्य नष्ट करणे किंवा त्यांच्याशी मैत्री करणे आवश्यक होते. शिवाजी महाराजांच्या कोकण जिंकण्याच्या प्रयत्नात त्यांची दंडराजपुरीच्या सिद्दीशी गाठ पडली. सुसज्ज आरमार असणाया सिद्दीला एकटयाने हरवणे शक्य नाही हे जाणून शिवाजी महाराजांनी राजापूरला आपल्या कैदेत असणाया इंग्रजांची मदत मिळवावी असा विचार केला. सिद्दी विरुध्दच्या मोहिमेत इंग्रजांनी आपल्याला मदत केल्यास त्यांना मीठ बंदर हे ठिकाण देण्यात येईल असे महाराजांनी आश्वासन दिले. इंग्रजांनी त्यास मान्यता दिली नाही.[९] तेव्हा १६६१ च्या पावसाळयात शिवाजी राजांनी सिद्दीच्या दंडपूरीवर आक्रमण केले आणि ते ठाणे जिंकून घेतले. त्यानंतर त्यांनी जंजियाच्या बेटावरील किल्ल्याला वेढा घातला. परंतु तोफा आणि शस्त्रसज्ज सैनिकांच्या कमतरतेमुळे ते किल्ला सर करण्यात अयशस्वी ठरले. शिवाजी महाराजांनी केलेल्या या हल्ल्यामुळे जंजियाचा प्रमुख इतका जेरीस आला की, त्याने मुंबईच्या अधिकायांना त्याला मदत करण्याकरता विनंती केली. सिद्दीची विनंती इंग्रजांनी स्वीकारली. [१०] आणि शिवाजी महाराजांनी केलेला हल्ला त्यांना मागे घेण्यास भाग पाडले.

रेवदंडा आणि राजापूरीचे किल्ले सिद्दीच्या ताब्यात होते. सिद्दीच्या सागरी आरमारामध्ये चाळीस ते पन्नास जहाजांचा समावेश होता. त्यांच्या साहाय्याने तो विविध प्रदेश बळकावून हस्तगत करीत असे आणि आपल्या भूमीचे रक्षण करीत असे. शिवाजी महाराजांच्या मुलूखास हानी पोहचविण्यास सिद्दीने सुरुवात केली. त्यामुळे शिवाजी महाराजांनी सेनाप्रमुख बाजी पासलकर याच्या नेतृत्वाखाली २००० मावळयांचे सैन्य त्यावर पाठविले आणि समुद्रात ये-जा करु शकणारी गलबतेही बांधली. याच काळात अली आदिलशहा याने सिद्दीच्या सहकार्याने शिवाजी महाराजांविरुध्द मोहीम उघडली. कोकणावरील या आक्रमणामध्ये विजापूरचा मांडलिक सावंत याने सिद्दीशी सहकार्य केले. त्यावेळच्या युध्दात सावंत आणि शिवाजी महाराजांचे सैनिक बाजी पासलकर दोन्ही धारातीर्थी पडले. त्यामुळे या दोघांचेही सैन्य युध्द सोडून आपल्या ठिकाणी परत गेले. त्यानंतर पुन्हा हस्तगत करण्यासाठी शिवाजी महाराजांनी रघुनाथ बल्लाळ अत्रे यांच्या नेतृत्वाखाली पाच ते सात हजारांचे अधिक मोठे बलशाली सैन्य पाठविले. रघुनाथ बल्लाळ अत्रेनी सिद्दीचा बिमोड केला. तळे, घोसाळे व इतर किल्ले जिंकून घेतले आणि दांडयापर्यंतचा सागरकिनारा लढून हस्तगत केला. मराठयांनी पावसाळयातही मोहीम चालू ठेवली आणि प्रदीर्घ काळ वेढा घालून दांडयाचा किल्ला जिंकून घेतला. या यशाचा पाठपुरावा करीत त्यांनी जंजियावर तोफा डागल्या. परंतु त्यांचा हा प्रयत्न अयशस्वी झाला. विजापूरहून मदत मिळण्याची आशा सोडलेल्या सिद्दीने शिवाजी महाराजांशी तह करुन दंडराजपूरी महाराजांच्या स्वाधीन केली. सिद्दीला पराभवामुळे वाईट वाटले. त्यामुळे थोडया कालावधीत शिवाजी महाराज व सिद्दी यांच्यातील शत्रूत्वाचा उद्रेक झाला. सिद्दीने पुन्हा किनारपट्टीवरील मराठी मुलूखात लूटमार व विध्वंस करण्याच्या कार्यास सुरुवात केली. पावसाळया व्यतिरिक्त इतर मोसमांमध्ये मराठेही दरवर्षी जंजियावर तोफा डागीत असत. तरीही ते जंजियाचा किल्ला हस्तगत करु शकले नाहीत. शिवाजी महाराजांनी जिंकून घेतलेल्या किनारी प्रदेशाची नीट व्यवस्था लावली. किनारपट्टीवरील आपल्या एका मुलूखास संलग्न प्रांताचे स्वरुप देऊन व्यंकोजी दत्तो नामक सुयोग्य व कार्यक्षम अधिकायाची त्या प्रदेशातील सुभेदार म्हणून नियुक्ती केली. त्यांच्या हाताखाली पाच ते सात हजार सैनिकांचे पथक कायम तैनातीत दिले.

**मराठयांचे जंजियावर हल्ले** शिवाजी महाराजांनी किनारी प्रदेशात किल्ले व आरमाराची उभारणी केल्यानंतर सिद्दी व शिवाजी हे दोन्ही पक्ष युध्दाकरता सज्ज राहण्याची तयारी करीत होते. दोन्ही विरोधक परस्परांच्या मुलूखांमध्ये जवळजवळ प्रत्येक दिवशी चढाई करीत आणि त्या चकमकीमुळे शांततेने चालू असणाया सागरी रहदारीस व्यत्यय येत असे. ऑक्टोबर १६६९ मध्ये शिवाजी महाराजांनी प्रचंड सामर्थ्यानिशी जंजियावर आक्रमण केले. या आक्रमणात सिद्दीची परिस्थिती अत्यंत बिकट झाली व खूप नुकसान झाले. किल्ल्यात रसद पुरवठा तुटल्यामुळे भूकेने जेरीस येऊन शरणागतीची वेळ येऊन ठेपलेल्या सिद्दीने मुंबईकर इंग्रजांची मदत मिळवण्यासाठी प्रयत्न केला.[११] त्यानंतरच्या वर्षी या संघर्षातील निर्णायक प्रसंग आला. शिवाजी महाराजांनी आपली सर्व साधने व सामर्थ्य जंजिरा जिंकून घेण्यासाठी एकत्रित केली. फत्तेखान सिद्दी शरणागती पत्करण्याचा विचार करीत होता परंतु त्याच्या हाताखालील संबळ, कासिम व खैरियत यांना हे पसंत पडले नाही.

**सागरी युध्द** इ.स.१६७२ मध्ये सिद्दी फत्तेखानाला पदच्युत करुन सिद्दी संबळ आरमार प्रमुख बनला. सिद्दी संबळ अत्यंत कार्यक्षम व धाडसी होता. तो सदैव मराठयांशी युध्द करण्यात गुंतलेला असे. मराठयांच्या सागरी व्यापार वाहतूकीस तो सतत अडचणी आणत असे. शिवाजी महाराजांच्या ताब्यात असलेले पनवेल, पेण आणि अलीबाग हे जिल्हे लुटण्याचा त्याचा विचार होता. म्हणून त्याने इंग्रज प्रेसिडेंटकडे आपल्या आरमारास मुंबई बंदरात येऊ देण्याची परवानगी मागितली. [१२] परंतु इंग्रज प्रेसिडेंटने ती नाकारली. इंग्रजांनी याप्रसंगी सिद्दीला मदत नाकारली होती. परंतु येथे औरंगजेब सिद्दीच्या मदतीस आला. त्याने सुरतहून लहान-मोठया अशा ३६ जहाजांचा तांडा दंडराजपुरीच्या सिद्दीच्या मदतीसाठी पाठविला. जेणेकरुन समुद्रातून दुहेरी आक्रमण करता यावे. मोगल आरमाराच्या

तुकडीने शिवाजी महाराजांची ५०० व्यापारी जहाजे नष्ट करुन महाराजांच्या ताब्यातील सर्व किनारी बंदरे जाळली व लुटली. मराठयांविरुध्द ही मोहीम यशस्वी करुन मोगल आरमार इंग्रजांची मदत घेण्यासाठी मुंबईस आले. परंतु इंग्रजांनी मदतीसाठी नकार दिला. मात्र डच नौदल अधिकायांनी दंडराजपुरी पुन्हा जिंकून घेण्यास शिवाजी महाराजांना २२ जहाजांच्या डच आरमाराची मदत देण्याचे आश्वासन दिले. त्यामोबदल्यात शिवाजी महाराजांनी डचांना मुंबई जिंकून घेण्याच्या मोहिमेत तीन हजार मराठे सैनिक मदतीस द्यावेत अशी अट होती. [१३] परंतु शिवाजी महाराजांनी डचांच्या आश्वासनाचा भरवसा धरला नाही आणि इंग्रजांशी मैत्रीपूर्ण संबंध चालू ठेवले.

१० ऑक्टोबर १६७३ रोजी सिद्दी संबळ आपल्या आरमारासह इंग्रजांची परवानगी न घेता मुंबई बंदरात आला आणि शिवाजीच्या मालकीची पेण व नागोठणे नदीवरील ठाणी त्याने उध्दवस्त केली.[१४] सिद्दी संबळने तेव्हा अनावश्यक रक्तपात केला आणि कित्येक माणसे, स्त्रिया व मुले पळवून गुलाम बनवून आपल्याबरोबर मुंबईस आणली. काही प्रमाणात व्यापारास उपद्रव झाला. त्यामुळे मुंबईच्या इंग्रज प्रमुखाने सिद्दीला आपली नाराजी कळणारे व तंबी देणारे पत्र पाठविले. प्रेसिडेंटच्या या पत्राकडे दुर्लक्ष करुन सिद्दीने आपले अत्याचार, जुलूम चालूच ठेवले. रायगडहून आलेल्या शिवाजी महाराजांच्या सैनिकांनी सिद्दीच्या माणसांना चकीत करुन निर्दयपणे कापून काढले. [१५] इ.स. १६७४ च्या फेब्रुवारी महिन्यात शिवाजी महाराज व सिद्दी यांच्यात तुंबळ युध्द झाले. दोन्ही पक्ष अगदी जेरीस आले होते तेव्हा सिद्दीने सुरतच्या इंग्रज प्रेसिडेंटला दोघांत मध्यस्थी करुन शांतता प्रस्थापित करण्याची विनंती केली. २५ मार्च १६७४ मध्ये सिद्दी संबळने रत्नागिरी जिल्हयातील मुचकुंढी खाडीत शिवाजी महाराजांचा आरमार प्रमुख दौलतखान यावर हल्ला चढविला. दोन्ही नौदल प्रमुख जखमी झाले. सिद्दीचे १०० तर मराठयांचे ४४ सैनिक कामी आले. मराठयांचा विजय झाला त्यामुळे सिद्दी संबळ जंजियाच्या दक्षिणेकडील हरेश्वर बंदरात निघून गेला.

इंग्रजांचा मराठयांकडे पाठवलेला दूत हेन्री ऑक्झिंडन याने शिवाजी महाराजांशी सौ◌ाहार्दाचे संबंध प्रस्थापित केले. याच्या प्रयत्नामुळे इंग्रज आणि शिवाजी महाराज परस्परातील मतभेद मिटवून सामंजस्य निर्माण करण्यास तयार झाले. ऑक्झिंडनने शिवाजी महाराज व सिद्दीच्या दरम्यान शांतता प्रस्थापित व्हावी असे सुचविले. [१६] परंतु त्यांचे प्रयत्न निष्फळ ठरले. १६७४ च्या सप्टेंबरमध्ये अफगाणमधील युध्द निर्णायक स्थितीत असताना औरंगजेब सिंधहून दिल्लीस परत आला होता. त्याने त्याचा सेनापती बहादूरखान यास तात्काळ शिवाजी महाराजांवर चाल करण्याचे आदेश दिले. [१७] त्याने सिद्दीला २०० लढवय्ये, जीवनावश्यक वस्तू, कित्येक लढाऊ गलबते आणि दोन प्रचंड नौका हे सर्व पुरविले. त्याचवेळी सिद्दीने इंग्रजांच्या हक्कांची पायमल्ली करु नये, उंदेरी, खांदेरी आणि चौलहून येणाया इंग्रजांच्या जहाजांची लूटालूट, जाळपोळ सिद्दीने करु नये, इंग्रजांच्या जहाजांनी सिद्दीच्या प्रदेशास त्रास देऊ नये या अटीवर शिवाजी महाराजांशी युध्दात गुंतलेल्या सिद्दीला इंग्रजही मदत करीत होते.[१८] शिवाजी महाराजांकडून इंग्रजांना खबर मिळाली ती सिद्दीने केलेल्या अत्याचाराविषयी होती. सिद्दी कोकण किनायवरील रहिवाशांवर अत्याचार करत होता. इंग्रजांना हे समजताच त्यांनी सिद्दीच्या जहाजावरील माणसे गिरफतार केली.त्यापैकी तिघांना फाशी दिली आणि इतरांना सेंट हेलेनावर पाठवून दिले. [१९] १६७७ च्या नोव्हेंबर महिन्यात आरमार प्रमुख या नात्याने सिद्दी कासिम कोकण किनारपट्टीवर गस्त घालत असे. वारंवार किनायावर उतरत असे आणि किनायावरील रहिवाशांना बळजबरीने पकडून नेत असे. १६७८ मध्ये पावसाळी मोसमात विश्रांती घेण्याकरता सिद्दी परत आला. तेव्हा शिवाजी महाराजांनी आपले आरमार प्रमुख दौलतखान आणि दर्यासारंग यांना ४००० सैनिकांच्या तुकडीसह पनवेलला पाठविले. खाडी पार करुन मुंबई बेटाच्या माझगाव बंदरात जहाज नांगरुन उभ्या असलेल्या सिद्दीचे आरमार जाळून नष्ट करण्याचे त्यांना आदेश दिलेले होते. परंतु प्रतिकूल हवामानामुळे दौलतखान खाडी ओलांडू शकला नाही आणि तो रायगडला परत आला. तेव्हा सिद्दी कासिमने आपली जहाजे अलीबागच्या किनायावर पाठवली आणि लूटालूट केली.

इ.स.१६७८ च्या ऑक्टोबर महिन्यात शिवाजी महाराजांनी संतप्त होऊन जंजियावर तोफा डागल्या. या प्रसंगी आपल्या सुरतेतील माणसांना पगार देऊ न शकल्यामुळे त्याची मदत न मिळालेल्या सिद्दीला मुंबई बंदरातच मुक्काम ठेवावा लागला. सिद्दीला तुल्यबळ असे आपले आरमार शक्तिशाली बनविण्याकरता महाराजांचे सात वर्षे प्रयत्न चालू होते. १६७८ पर्यंत महाराजांच्या आरमारात २० गुराबे (शिडाची जहाजे) आणि ४० गलबते होती. परंतु भर समुद्रात सिद्दीच्या आरमाराच्या प्रचंड नौकापुढे त्यांचे सामर्थ्य कमी पडत असे. [२०] शिवाजी महाराजांचे असे मत होते की, त्यांना जंजिरा घेण्यामध्ये पुन्हा पुन्हा अपयश येते आणि सिद्दी मराठयांच्या मुलूखावर हल्ले चढवतो याचे कारण त्याला इंग्रजांनी बंदरात थारा दिला हे होय. यामुळे इंग्रजांना त्यांचे तटस्थतेचे धोरण अधिक कडक आणि स्पष्ट करण्यास प्रवृत्त करावे असा महाराजांनी दृढ विचार केला. सिद्दीवर वचक ठेवण्यास सोईस्कर अशी खांदेरी, उंदेरी बेटे महाराजांनी काबीज केली. खांदेरी मराठयांच्या हाती राहणे इंग्रजांच्या विशेषकरुन मुंबईकर इंग्रजांच्या दृष्टीने सर्वस्वी अनिष्ट ठरणारे होते. कारण मुंबई बंदरात येणारे किंवा बाहेर पडणारे कोणतेही जहाज खांदेरीतील टेहाळणी चुकवून जाऊ शकणार नव्हते. म्हणजेच बंदरात येणाया किंवा जाणाया प्रत्येक जहाजांची मराठयांना खबर मिळाली असती. त्यामुळे पुढे आलेल्या संकटाच्या भीतीने इंग्रज सावध झाले आणि त्यांनी शिवाजी महाराजांविरुध्द सिद्दीला मदत करण्याचे ठरविले. जंजियाचे आपले बस्तान दृढ करण्यास सिद्दी कासिमदेखील उत्सुक होता. आपले आरमार सुसज्ज ठेवण्यात त्याला इंग्रजांची आवश्यक ती मदत मिळाली. [२१] सिद्दी कासिम आरमारासह मुंबई बंदरात आला आणि मराठयांना खांदेरीवरुन हुसकावून लावण्याच्या कामी इंग्रजांनी व सिद्दीने संयुक्तपणे खांदेरीवर आक्रमण करावे असे इंग्रजांनी आवाहन केले. सिद्दी कासिमच्या आरमारात दोन मोठी जहाजे, तीन शिडवाल्या युध्दनौका, पंधरा भक्कम गलबते आणि सातशे उत्तम लढवय्ये सैनिक यांचा समावेश होता. इंग्रजांना सिद्दीचा खांदेरी बेट आपल्या ताब्यात घेण्याचा

मनोदय माहित होता. त्यामुळे त्यांनी सिद्दीला मदत देण्याची टाळाटाळ केली. परंतु इंग्रजांनी मदत देण्याचे टाळले म्हणून सिद्दी कासिम निराश झाला नाही. त्याच्या दोन मोठया जहाजांवरुन त्याने कित्येक दिवसपर्यंत खांदेरी बेटावर तोफांचा भडीमार केला. मराठयांच्या तोफांनीदेखील त्यास प्रत्युत्तर दिले परंतु कोणत्याही पक्षास अपेक्षित हेतू साधता आला नाही.

**संदर्भ :**

१) बेंद्रे वा. सी., श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र (पूर्वार्ध व उत्तरार्ध) साहित्य सहकार मुद्रणालय, अलिबाग १९७२, पृ.६८८.
२) खोबरेकर वि.गो., महाराष्ट्राचा इतिहास (मराठा कालखंड भाग-१ इ. स.१६३०-१७०७) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००६, पृ.६९
३) कुलकर्णी अ.रा व खरे ग.ह (संपा) मराठ्यांचा इतिहास खंड - १, कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे, १९८४,पृ.२१३
४) कित्ता पृ.२१४
५) बेंद्रे वा.सी. उपरोक्त पृ. ६९२
६) Sarkar Jadunath, Shivaji and his times, Oriental longman publication, Mumbai, 1973, p.p.258
७) Ibid p.p.,259
८) Ibid p.p.,262
९) Paranjape B.G.& Kale D.V., English Records on Shivaji (1659-1682), Shivcharitra Karyalaya, Pune, vol.II, p.p.23
१०) Banaji D.R., Bombay and Sidis, Francis F.E. Macmilan & co.Ltd, Bombay, 1932, p.p. 11-12
११) Sarkar Jadunath, p.p.,264
१२) Banaji D.R., p.p. 15
१३) Ibid p.p.,16,17
१४) Orme Robert, Historical frangments of the Mughal empire (vol.I), F.Wingrave, London, 1805, p.p.39
१५) Banaji D.R., p.p.19
१६) Sarkar Jadunath,p.p.267
१७) Banaji D.R., p.p. 22
१८) Banaji D.R., p.p. 23
१९) Anderson Phillip, The English in Western India, Taylor & co., Bombay, 1854, p.p.81
२०) Orme Robert, p.p.78
२१) खोबरेकर, उपरोक्त पृ.१३५